सकाळ
पुणे, मंगळवार, दि.१३ जुलै २०२१

# संतसाहित्य परिषदेचे गुरुवारपासून आयोजन

**पुणे** : एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समितीच्या वतीने 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदे'चे आयोजन केले आहे. 'एमआयटी'चे कार्याध्यक्ष प्रा. राहुल कराड यांची संकल्पनेतून १५ ते १८ जुलै या कालावधीत ही परिषद ऑनलाइन होणार आहे. तिचे उद्घाटन गुरुवार (ता. १५) दुपारी दोन वाजता होणार आहे. या वेळी केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी, हिमाचल प्रदेशचे माजी राज्यपाल विष्णू कोकजे, किसन महाराज साखरे, विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड उपस्थित राहणार आहेत.

लोकमत
पुणे, मंगळवार, दि.१३ जुलै २०२१

# भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद

पुणे : एमआयटी वर्ल्ड पीस युनीव्हर्सिटी आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या १५ ते १८ जुलै या कालावधीत ऑनलाइन 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदेचे' आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेचे उद्घाटन १५ जुलैला दुपारी २ वाजता केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याहस्ते होणार आहे. यावेळी हिमाचल प्रदेशचे माजी राज्यपाल विष्णू कोकजे, ज्येष्ठ कीर्तनकार किसन महाराज साखरे उपस्थित राहणार आहेत. यावेळी एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड हे 'आमचे संत तत्वज्ञ नव्हते का? या विषयावर बीजभाषण देणार आहेत.

पुढारी

पुणे, मंगळवार, दि.१३ जुलै २०२१

# संतसाहित्य उच्च शिक्षण परिषद १५ जुलैपासून

**पुणे :** एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्री क्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी देवाची, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय संतसाहित्य उच्च शिक्षण परिषद' गुरुवार, दि. १५ ते १८ जुलै २०२१ या कालावधीत ऑनलाइन आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेमध्ये प्रामुख्याने संतसाहित्य : समृद्ध जीवन जगण्याचे आधुनिक शास्त्र, वारकरी संप्रदाय विचार : आधुनिक की कालबाह्य?, भारतीय संतविचाराचे खच्चीकरण इंग्रजी शिक्षण पद्धतीने केले काय, संत आणि आरोग्य व्यवस्थापन, आमच्या तत्त्वज्ञ संतांना धार्मिक कोणी ठरविले, भारतीय शिक्षण अभ्यासक्रमात भारतीय संत गौण का? ही सहा सत्रे होणार आहेत. प्रत्येक सत्रात विशेष ठराव पारित करून शिक्षणाबाबत रूपरेषा ठरविण्यासाठी राज्य/केंद्र शासनाकडे पाठविण्यात येतील, अशी माहिती देहू संस्थानचे माजी अध्यक्ष रविदास महाराज शिरसाठ, समन्वयक डॉ. संजय उपाध्ये व डॉ. महेश थोरवे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

प्रभात
पुणे, मंगळवार, दि.१३ जुलै २०२१

# भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद १५ जुलैपासून

प्रभात वृत्तसेवा

- संत साहित्यांचा उच्च शिक्षणात समावेश होणे ही काळाची गरज
- केंद्रीय रस्ते व वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत उद्घाटन

**पुणे, दि. १२** - एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी देवाची यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद' दि. १५ ते १८ जुलैदरम्यान ऑनलाइन आयोजित करण्यात आली आहे. ज्ञान, विज्ञान, तत्त्वज्ञान, भक्ती, श्रद्धा या सर्वांचा उहापोह करणारे संतसाहित्याचा उच्च शिक्षणात समावेश होणे ही काळाची गरज आहे. त्यादृष्टीने परिषदेत विचारमंथन होईल. संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. राहुल कराड यांच्या पुढाकारातून ही परिषद होत आहे.

केंद्रीय रस्ते व वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थितीत परिषदेचे उद्घाटन होईल. माजी राज्यपाल विष्णू कोकजे, ह.भ.प. किसन महाराज साखरे यांची प्रमुख उपस्थित राहील. संस्थेचे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड हे 'आमचे संत तत्त्वज्ञ नव्हते का?' या विषयावर बीजभाषण देणार आहेत.

समारोपप्रसंगी सरसंघचालक मोहन भागवत, संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भटकर, खासदार विनय सहस्रबुद्धे, मुख्य सचिव सिताराम कुंटे यांची उपस्थित राहणार आहे, अशी माहिती परिषदेच्या संयोजन समितीचे कार्याध्यक्ष हभप रविदास महाराज शिरसाठ, समन्वयक डॉ. संजय उपाध्ये आणि महेश थोरवे यांनी दिली.

दैनिक दिव्य मराठी
औरंगाबाद, अहमदनगर, नाशिक व सोलापूर
मंगळवार, दि.१३ जुलै २०२१

# भारतीय संत साहित्य उच्चशिक्षण परिषद आता ऑनलाइन होणार

प्रतिनिधी | पुणे

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी देवाची, यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय संत साहित्य उच्चशिक्षण परिषद' १५ जुलै ते १८ जुलै २०२१ या कालावधीत ऑनलाइन पद्धतीने आयोजित करण्यात आली आहे.

भारतीय संत साहित्यामध्ये अनेक वैज्ञानिक व तात्त्विक तथ्यांचा उल्लेख आढळतो. अर्थात भारतीय संतांना भारतीय ज्ञानपरंपरेतून उपजलेल्या अनेक शोधांबद्दल माहिती होती, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. अनेक पाश्चात्य वैज्ञानिकांच्या नावे असलेले शोध हे पूर्वी भारतामध्ये लागले असल्याचे आता जगासमोर आले आहे. म्हणजेच, ज्ञान, विज्ञान, तत्त्वज्ञान, भक्ती, श्रद्धा या सर्वांचा ऊहापोह करणारे संतसाहित्य ह्याचा उच्चशिक्षणात समावेश होणे ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर, सध्याच्या शिक्षण पद्धतीमध्ये संत साहित्याचा अंतर्भाव नाही, तसेच हे संत साहित्य काळाच्या कसोटीवर उतरलेले असून, ते धार्मिक नाही, तर पूर्णपणे वैज्ञानिक आहे, यावर या परिषदेत विचारमंथन होईल. एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. राहुल वि. कराड यांची संकल्पना व पुढाकारातून ही पहिली भारतीय संत साहित्य उच्चशिक्षण परिषद होत आहे.

या परिषदेचा उद्‌घाटन समारंभ १५ जुलै रोजी दुपारी २ वाजता केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. समारोप सत्र १८ जुलै रोजी दुपारी ४.३० वाजता होईल.

# नवभारत

**पुणे, मंगळवार, दि.१३ जुलै २०२१**

# संतों के साहित्य पर होगा समागम




## 6 सत्र आयोजित होंगे

एमआईटी वर्ल्ड पीस यूनिवर्सिटी के कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड की अवधारणा और पहल में सम्मेलन का आयोजन होने जा रहा है. इस चार दिवसीय सत्रों में छह सत्रों पर विचार रखे जाएंगे. पहला सत्र का विषय 'संत साहित्य समृध्द जीवन जीने का आधुनिक विज्ञान' यह होगा. इस सत्र में प्रमुख वक्ता डॉ. मिलिंद जोशी, हभप ज्ञानेश्वर महाराज वाबले, हभप जगन्नाथ महाराज पाटिल, हभप गुरूबाबा महाराज औसेकर, हभप प्रकाश महाराज बोधले, हभप अच्यूत महाराज दस्तापुरकर तथा हभप रामकृष्ण लहवितकर रहेंगे.

■ **पुणे,** नवभारत न्यूज नेटवर्क. एमआईटी-वर्ल्ड पीस यूनिवर्सिटी और श्रीक्षेत्र आलंदी-देहू परिसर विकास समिति के संयुक्त तत्वावधान में पहली 'भारतीय संत साहित्य उच्च शिक्षा परिषद' 15 से 18 जुलाई के दौरान होगी. यह परिषद ऑनलाइन होगा. परिषद का उद्घाटन 15 जुलाई की दोपहर 2 बजे होगा. इस मौके पर हिमाचल प्रदेश के पूर्व राज्यपाल विष्णु कोकजे तथा ज्ञानेश्वरी के अध्ययनकर्ता हभप किशन महाराज साखरे बतौर सम्माननीय अतिथि के रूप में उपस्थित होंगे. इस समय एमआईटी वर्ल्ड पीस यूनिवर्सिटी के संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड अपने विचार रखेंगे, ऐसी जानकारी ऐसी जानकारी प्रेस वार्ता में दी गई.

## राज्य के मुख्य सचिव सीताराम कुंटे विशेष अतिथि

इस प्रेस वार्ता में भारतीय संत साहित्य उच्च शिक्षा परिषद की संयोजन समिति के समन्वयक डॉ. संजय उपाध्ये, संत साहित्य के अभ्यासक एवं कीर्तनकार, संयोजन समिति के कार्याध्यक्ष हभप रविदास महाराज शिरसाठ तथा एमआयटी वर्ल्ड पीस यूनिवर्सिटी के डॉ. महेश थोरवे उपस्थित थे. संयोजन समिति की ओर से बताया गया कि 18 जुलाई की शाम 4.30 बजे के समापन सत्र में कम्प्यूटर विशेषज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर एवं राज्य के मुख्य सचिव सीताराम कुंटे विशेष सम्मानिय अतिथि के रूप में उपस्थित रहेंगे. इस सत्र की अध्यक्षता एमआईटी विश्व शांति विश्वविद्यालय के संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ दा. कराड निभाएंगे.

## दूसरे सत्र में वारकरी संप्रदाय के विचार

आधुनिक समाप्ति' विषय पर इंद्रजीत भालेराव, भागवताचार्य हभप माधव महाराज राठी, एड.जयवंत महाराज बोधले, हभप योगीराज महाराज गोसावी, हभप उध्दव महाराज मंडलिक तथा हरीहर महाराज दिवेगावकर मार्गदर्शन देंगे. तीसरे सत्र में 'क्या भारतीय शिक्षाशास्त्र ने भारतीय संतत्व को विकसित किया' इस विषय पर हभप उल्हास पवार, कोल्हापुर विश्वविद्यालय के कुलपति डॉ. दिगंबर शिर्के, हभप चंद्रशेखर महाराज देगलूरकर, चारूदत्त आफले, डॉ. विवेक सावंत, भावार्थ देखणे, डॉ. पुष्पिता अवस्थी तथा हभप चंद्रकांत महाराज वांजले अपना मंतव्य देंगे. चौथा सत्र 'संत और स्वास्थ्य प्रबंधन' विषय पर डॉ. बालाजी तांबे, डॉ. तात्याराव लहाने, हभप अर्जुन महाराज लाड, हभप मुकुंद महाराज जाडदेवलेकर, बालासाहेब बडवे, डॉ. विश्वास सापत्नेकर, हभप केशव महाराज उखलीकर बोलेंगे. इसके अलावा पांचवें सत्र में 'हमारे दार्शनिक संतों को किसने धार्मिक बनाया' विषय पर हभप संजय महाराज धोंडगे, हभप तुकाराम महाराज गरुड ठाकुरबुवा दैठणेकर, डॉ. विजय भटकर, महामंडलेश्वर श्री श्री 1008 ईश्वरनंद ब्रह्मचारी, उत्तमस्वामी महाराज, पं. वसंतराव गाडगील, डॉ. रामचंद्र देखणे, डॉ. सदानंद मोरे, डॉ. विजय कुमार फड, उत्तम स्वामीजी महाराज तथा हभप सुदाम महाराज पाणेगावकर जानकारी देंगे.छठवें सत्र में 'भारतीय शिक्षा पाठ्यक्रम में भारतीय संत गौण क्यों है' विषय पर हभप चैतन्य महाराज देगलुरकर, हभप दिनकर शास्त्री भुकेले, एसएनडीटी विश्वविद्यालय की पूर्व कुलपति डॉ, शशिकला वंजारी, डॉ. अभय तिलक, आचार्य स्वामी त्रिवेंद्रानंद सरस्वति महाराज, डॉ. श्रिनिवास वरखेडी एवं हभप धर्मराज हांडे के अलावा इस सम्मेलन में जाने माने शिक्षा विशेषज्ञ, कीर्तनकार, उपदेशक, दार्शनिक और संत साहित्य के विद्वान अपने विचार प्रस्तुत करेंगे.

**जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.**

बातम्यांचा राजा
जनप्रवास
पुणे, मंगळवार, दि.१३ जुलै २०२१




# पहिली भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद १५ जुलै पासून

**पुणे**
**जनप्रवास प्रतिनिधी**

दि: १२ जुलै : एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी–देहू परिसर विकास समिती, आळंदी देवाची, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद' गुरूवार, दि. १५ जुलै २०२१ ते रविवार, दि. १८ जुलै २०२१ या कालावधीत ऑनलाइन आयोजित करण्यात आली आहे.

भारतीय संतसाहित्यामध्ये अनेक वैज्ञानिक व तात्त्विक तथ्यांचा उल्लेख आढळतो. अर्थात भारतीय संतांना भारतीय ज्ञानपरंपरेतून उपजलेल्या अनेक शोधांबद्दल माहिती होती, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. अनेक पाश्चात्त्य वैज्ञानिकांच्या नावे असलेले शोध हे पूर्वी भारतामध्ये लागले असल्याचे आता जगासमोर आले आहे. म्हणजेच, ज्ञान, विज्ञान, तत्त्वज्ञान, भक्ती, श्रद्धा या सर्वांचा ऊहापोह करणारे संतसाहित्य ह्याचा उच्चशिक्षणात समावेश होणे ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर, सध्याच्या शिक्षणपद्धतीमध्ये संतसाहित्याचा अंर्तभाव नाही, तसेच हे संतसाहित्य काळाच्या कसोटीवर उतरलेले असून, ते धार्मिक नाही, तर पूर्णपणे वैज्ञानिक आहे, यावर या परिषदेत विचारमंथन होईल.

एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. राहुल वि. कराड यांची संकल्पना आणि पुढाकारातून ही पहिली भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद संपन्न होत आहे.

केसरी

# पुणे, मंगळवार, दि.१३ जुलै २०२१

# संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद १५ जुलैपासून

**पुणे** : एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती यांच्या वतीने 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद' गुरूवार, दि. १५ जुलै ते रविवार, दि. १८ जुलै या कालावधीत ऑनलाइन होत आहे. संतसाहित्याचा उच्चशिक्षणात समावेश होणे ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर, सध्याच्या शिक्षणपद्धतीमध्ये संतसाहित्याचा अंर्तभाव नाही, तसेच हे संतसाहित्य काळाच्या कसोटीवर उतरलेले असून, ते धार्मिक नाही, तर पूर्णपणे वैज्ञानिक आहे, यावर या परिषदेत विचारमंथन होईल.

एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. राहुल कराड यांच्या संकल्पनेतून ही परिषद होत आहे.

या परिषदेच्या उद्घाटन समारंभास १५ जुलै रोजी नितीन गडकरी प्रमुख पाहुणे असून विष्णू कोकजे, किसन महाराज साखरे यांची उपस्थिती राहील. एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड 'आमचे संत तत्वज्ञ नव्हते का?' या विषयावर बीजभाषण देणार आहेत.

समारोप सत्रात सरसंघचालक मोहन भागवत, संगणक तज्ज्ञ, डॉ. विजय भटकर, आयसीसीआरचे अध्यक्ष, खासदार विनय सहस्रबुद्धे, राज्याचे मुख्य सचिव सिताराम कुंटे उपस्थित राहतील.

या परिषदेमध्ये संतसाहित्य - समृद्ध जीवन जगण्याचे आधुनिक शास्त्र, वारकरी संप्रदाय विचार : आधुनिक की कालबाह्य?, भारतीय संतविचाराचे खच्चीकरण इंग्रजी शिक्षणपद्धतीने केले काय?, संत आणि आरोग्य व्यवस्थापन, आमच्या तत्त्वज्ञ संतांना धार्मिक कोणी ठरविले?, भारतीय शिक्षण अभ्यासक्रमात भारतीय संत गौण का? या विषयांवर सत्रे होतील. या परिषदेतील प्रत्येक सत्रात विशेष ठराव मंजूर करून, शिक्षणाबाबत रुपरेषा ठरविण्यासाठी राज्य-केंद्र शासनाकडे पाठविण्यात येतील. नोंदणीसाठी www.santsahityashikshan.org या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन श्री क्षेत्र देहू संस्थानचे माजी अध्यक्ष आणि पहिल्या भारतीय संत साहित्य उच्चशिक्षण परिषदेच्या संयोजन समितीचे कार्याध्यक्ष रविदास महाराज शिरसाठ, समन्वयक डॉ. संजय उपाध्ये व डॉ. महेश थोरवे यांनी केले.

पुरोगामी विचाराचे
एकमत
लातूर, मंगळवार, दि.१३ जुलै २०२१



# संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद १५ जुलैपासून

**पुणे :** एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी देवाची, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद' गुरूवार, दि. १५ जुलै २०२१ ते रविवार, दि. १८ जुलै २०२१ या कालावधीत ऑनलाइन आयोजित करण्यात आली आहे. एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. राहुल वि. कराड यांची संकल्पना आणि पुढाकारातून ही पहिली भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद संपन्न होत आहे.

या परिषदेचा उद्घाटन समारंभ गुरूवार दि. १५ जुलै २०२१ रोजी दुपारी २ वा. होणार आहे. यासाठी नितीनजी गडकरी, केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री, सन्माननीय प्रमुख पाहुणे म्हणून प्रस्तावित असून, विष्णू कोकजे, माजी राज्यपाल, हिमाचल प्रदेश व ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक व ज्येष्ठ कीर्तनकार व प्रवचनकार ह.भ.प.श्री किसन महाराज साखरे,यांचीउपस्थिती . एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष व तत्त्वज्ञ प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे 'आमचे संत तत्वज्ञ नव्हते का?'या विषयावर बीजभाषण देणार आहेत. समारोप सत्र रविवार, दि. १८ जुलै २०२१ रोजी दुपारी ४.३० वा.होईल. प्रमुख पाहुणे म्हणून मोहन भागवत (सरसंघचालक, रा.स्व.संघ), संगणकतज्ञ, पद्मभूषण डॉ. विजय भटकर, खा.विनय सहस्रबुद्धे, राज्याचे मुख्य सचिव सिताराम कुंटे, एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ दा कराड हे सन्माननीय अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत.

**जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.**

महाराष्ट्र लोकमंच

पुणे, मंगळवार, दि.१३ जुलै २०२१




Latest News PUNE

# पहिली भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद १५ जुलै पासून

July 12, 2021 maharashtralokmanch 0 Comments एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद

पुणे एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी देवाची, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद' गुरूवार, दि. १५ जुलै २०२१ ते रविवार, दि. १८ जुलै २०२१ या कालावधीत ऑनलाइन आयोजित करण्यात आली आहे.

एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. राहुल वि. कराड यांची संकल्पना आणि पुढाकारातून ही पहिली भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद संपन्न होत आहे.

या परिषदेचा उद्घाटन समारंभ गुरूवार दि. १५ जुलै २०२१ रोजी दुपारी २ वा. होणार आहे. यासाठी नितीन गडकरी, केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री, हे प्रमुख पाहुणे म्हणून प्रस्तावित असून, विष्णू कोकजे, माजी राज्यपाल, हिमाचल प्रदेश व ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक व ज्येष्ठ कीर्तनकार व प्रवचनकार ह.भ.प.श्री किसन महाराज साखरे, हे विशेष सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष व तत्त्वज्ञ प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे 'आमचे संत तत्वज्ञ नव्हते का?' या विषयावर बीजभाषण देणार आहेत.

समारोप सत्र रविवार, दि. १८ जुलै २०२१ रोजी दुपारी ४.३० वा. होईल. या समारंभासाठी सन्माननीय प्रमुख पाहुणे म्हणून मोहन भागवत, सरसंघचालक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे प्रस्तावित असून, संगणक तज्ञ, पद्मभूषण डॉ. विजय भटकर, आयसीसीआरचे चेअरमन, राज्यसभेचे खासदार विनय सहस्रबुद्धे, महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव सिताराम कुंटे विशेष सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ दा कराड हे सन्माननीय अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत.